REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 8 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2019

# महाराष्ट्रातील बारव स्थापत्य

**डॉ. लदाफ एस.के.**
इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय,
औसा ता. औसा जि. लातूर.

**प्रस्तावना :-**



महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनाचा असाधारण महत्त्व असलैल्या बारव स्थापत्य याचा अीयास फारसा झालेला नाही एका विशिष्ट कालखंडामध्ये मंदिराची उभारणी आपल्याकडे फार मोङ्या प्रमाणात झाली सामान्यपणे यादव शैलीची हेमानपंथी म्हणन अशी मंदिर ओळखले जातात त्याचीनिर्मिती मोठ्या प्रमाणात होत होती प्राचीन साहित्य आद्याप मराठी वाङःमय आणि आणि मुरड मराठी बोली भाषेत जलाशयाला आणि पर्यायी शब्द रुढ आहेत अगदी प्रारंभी काळात निर्मिती बरोबरच पाणी पाणपोठी किंवा पानपोडी म्हणजे पिण्याची पाणी साठविण्यासाठी टाकी आणि स्नान कोठी म्हणजे स्नानासाठी आणि उपयोगासाठी लागनाऱ्या पाण्याचा साठा करण्यासाठी विविध आकाराच्या टाक्या खोलण्यात आल्या होत्या१

किल्ल्याची निर्मिती होत असताना सतत प्रथम निश्चित जलस्त्रोताचा शोध घेऊन आवश्यक त्या ठिकाणी टाक्या कुप तयार केल्याचे दिसतात. गोदावरी कृष्णा मांजरा चंद्रभागा अशा नद्यांच्या परिसरात वसाहती निर्माण झाल्या तेथे प्रामुख्याने घाट बांध्याण्यात आले निसर्गतः उपलब्ध नदीच्या काठाच्या योग्य उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने अशा वैशिष्ट्यपुर्ण घाटाची निर्मिती सातवाहन काळापासून होत असावी अन्य स्थानावर नगरे वसवताना मात्र भूगर्भातील जलाशयाचा शोध घेऊन विविध प्रकारचे आड विहिरी बारव व पोरणी याची निर्मिती करण्यात आली. दक्षिण भारतामध्ये रामेश्वर सारख्या जंबु दिपावर जाणीवपुर्वक अनेक तीर्थ व पुष्करणी यांची निर्मिती झाली केवळ रामेश्वर मंदिरामध्ये २२ वापी २.

महाराष्ट्रामध्ये लोणार जिल्हा बुलढाणा येथे उलकापात पासुन निर्माण झालेल्या विवराच्या परिसरात अनेक बारवांची निर्मिती करण्यात आली. विविध राजवटीतील प्रमुख स्थाने व तीर्थ क्षेत्रे उदा. त्रिंबकेश्वर , परळी वैजनाथ, ओढा नागनाथ, माहुर तुळजापूर , कोल्हापूर अशा ठिकाणी अनेक कुंड कल्लोळ, यांची निर्मिती झाली या स्थानावरील जल समुहाची पाण्याची गरज भागविण्याच्या दृष्टीने अशा वस्तुची निर्मीती होत असतानाच पुण्य प्राप्ती विशेषयक संकल्पनाही जनमानसत रुजविली गेली. यातुन लोनार, चारठाना, इंडोळी, सिंदखेडराजा, पिंगळी. इ. ठिकाणी प्रशस्त बारवांची निर्मिती झाली. एका मोठ्या बारवांच्या बांधकामासाठी घ्यावे लागणारे परिश्रम हे एक मंदिर संकुलाची उभारणी करता येईल. बारवांच्या संदर्भामध्ये त्यांचे पावित्रय जपण्याच्या दृष्टीने अनेक लोक कथा रुढ झाल्याचे विविध स्थल महात्मयातुन दिसते व पौराणीक संदर्भ ही याला दृष्टी देतात. बारव निर्मितीचे तंत्र आणि त्याचे आकार प्रकार या विषयी प्रायीन ग्रंथातुन उल्लेख आढळतात. श्री. भुवनदेव यांची लिहलेल्या ‘अपराजित प्रच्छा’या ग्रंथात ‘बापी कुपत डागा दिर्णयो नाम’ या मथळ्याचे प्रकरण आहे. यात म्हटल्या प्रमाणे नगराच्या व आत निरनिराळ्या प्रकारचे जलाशय आसावेत. विहीर पाणी, हे कुपाचे प्रकार आहेत. कुंड म्हणजे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्नानासाठी बांधलेल्या मोठ्या आकाराचे पण उथळ हौद कुपाचे दहा वापीचे चार, कुंडाचे

चार व तडागाचे सहा प्रकार या ग्रंथात दिले आहेत. 'नंदा ' म्हणजे विहीरीच्या पाण्याच्या पातळीपर्यंत जाण्यासाठी विहीरीस असलेला प्रवेश मार्ग तर कुट म्हणजे चौरस खोली मंडळ किंवा माड होय हे आकराने चौरस किंवा आयतावृत्ती असतात ३.

**कुंड :-** कुंड म्हणजे तीर्थस्थानाच्या ठिकाणी स्नानासाठी बांधलेला मोठ्या आकाराचा उथळ हौद, याचा आकार साधारणः २ ते २.५ मीटर खोल व ९ आणि १० मिटर चौरस रुंद असा आढळतों. तेर जिल्हा उस्मानाबाद , येथे राज्य पुरात्व विभागाने केलेल्या साफसफाईच्या वेळी आढळलेले कुंड हे महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन कुंड असुन ते विटानी बांधलेले आहे. ८.३० सेंटीमीटर आकाराच्या या कुंडाची तळापासुन उंची २.७० मीटर आहे. ९ ते १० से.मी. चा एक टप्पा असे तीन टप्पे यात आहेत. इ.स. पहिल्या शतकातील सातवाहन काळातील हे कुंड आहेत. तर विदर्भातील मांढळ जि. नागपर येथे चौथ शतकातील विटानी बांधलेले कुंड उपलब्ध आहेत. हे वाकाटक कालिन असुन वाकाटकराजा दुसरा प्रवसेन व दुसरा पृथ्वीसेन याचे ताम्रपट येथे मिळाले आहेत. कुंड या प्रकारात येणाऱ्या वास्तुची उदाहरणे होट्टल, मुखेड, माहुर जि. नांदेड पाली जि. बीड. त्र्यंबकेश्वर जि. नासीक, इ. ठिकाणी आहेत मुद्दाम तयार केलेल्या जलाशयाच्या जवळ प्रसंगी कुडाची निर्मीती करण्यात आलेली होती.४

**विहीर :-** एक प्रवेश असलेली वापी म्हणजे विहीर याला पाचविहीर असेही म्हणतात. यामध्ये वर्तुळ, अष्टकोन व चौरस असे आकार आढळतात कंधार. जि. नांदेड येथे राष्ट्रकुटकालीन पुरात्व क्षेत्र असलेल्या भागात इ.स. १९९५ मध्ये रस्त्याचे काम चालू असताना चौरस आकाराची एक पायविहीर उघडकिस आली तळणी ता. हदगाव जि. नांदेड येथे विटानी बांधलेली विहीर असुन दगडी चिऱ्यांच्या पायऱ्या यामध्ये दोन देवकोष्ठ आहेत. वर्तुळाकार विहीराची उदा. कंधार (नांदेड) चकलांबा (बीड) पाणगांव (जि. लातूर) या ठिकाणी मिळतात तर अष्टकोनी आकाराची विहीर, धर्मापूरी,(बीड)व लासूर (औरंगाबाद) या ठिकाणी आहेत.५

**विहीर :-** द्वारहीन जलाचा संग्रह म्हणजे कूप यालाच आढ असे म्हणतात. ही केवळ, मार्यादीत उपयोगासाठी बांधलेली वास्तू असुन याला प्रवेश मार्ग नसतो. आडाचा आकार साधारणपे एक मीटर पेक्षा कमी व्यासाचा असतो. यामध्ये प्रामुख्याने चौरस आष्टकोनी, आकार आढळतात. कंधार येथे अष्टकोनी आकारातील आड असुन त्याची रचना वैशिष्ट्ये पुर्ण आहे. एखादी टोपली विनादी त्या प्रमाणे दगडी शिळाची रचना असलेला हा आड खालील बाजुस निमुळता होत जातो मुखेड जि. नांदेड येथेल चालुक्य कालीन दाशरथेश्वर मंदिराजवळील चौरस आड 90x90 सेंन्टीमीटरची आहे. अर्धापूर माहुर, मुगूट इ. यादवकालीन आड आहेत.६

**बारव :-** कुंड हा मुळात या वास्तु प्रकाराचा आधारभुत घटक ठरतो. या कुंडाच्यावर विशिष्ट पायऱ्या ठेवुन एक पटांगण ठेवतात. क्ष्यानंतर दुसरा व तिसरा पठांगण ठेवुन झालेला विस्तार यातुनच बारव स्थापत्य पहावयास मिळतो. बारवेत विविध देवत्यांची स्थापना केली जाते. त्यासाठी असलेली देवकोष्टे सर्वात वरच्या सोपानावर स्वतंत्र अशी अगदी संरक्षक भींती आणि प्रवेश मार्गाच्या दोन्ही बाजुंना ठेवतात. बारवेत प्रामुख्याने चौरस आकार आढळतो. आयोत व क्वचित अष्टकोनी आकार पाहावयास मिळतात. बारवे एक ते चार प्रमुख प्रवेश असतातस. एक प्रवेश चौरस आकार असलेल्या येरगी देगलुन (नांदेड) येथील बारवे तीन टप्पे आहेत. आयात आकारणी बारव मुखेड (नांदेड) असुन 16x10

सेटिमिटर आकाराची एक वैशिष्टपूर्ण बारव आहेत. बारवांच्या प्रदेशावर असलेल्या सज्जा आज अस्तित्त्वात नाही. विविध सोपानावरुन खाली उतरण्यासाठी असलेल पायऱ्यां व एकुण रचना पाहता कर्नाटकातील हॅपी (बेल्लारी) येथील उत्खलना मिळालेल्या बारवेशी हिचे साम्य आढळते. या परिसरातील शिलालेख अन्य वस्तु पाहता बारव चालुक्यकालीन असुन ती बाराव्या शतकातील आहेत असे म्हणता येते. एक प्रवेश असलेली व अष्टकोणी आकाराची बारव मरळक खुर्द नांदेड येथे असुन बारवेल लगत दगडी हौद आहे. बारवेतील पाणी रहावाद्वारे उपसुन ते प्रणालाद्वारे हौदात जमा केले जाते. मोटेची व्यवस्था असलेली उत्कृष्ट अशी चौकार बारव येवती ता. बिलोली जि. नांदेड येथे आहे. मंन्चर जि. पूणे याठिकाणी शिलालेख असलेली चौकोणाकार बारव आहे. तर दोन प्रदेश असलेल्या बारव मध्ये सिल्लोड जि. औरंगाबाद कुसाळे जि. सातारा पुरंदर जि. पूणे येथील बारव उल्लेखनीय असुन या संबंधातील सर्वात चांगली बारव जागजी जि. उस्मानाबाद येथे आहे. २४ से.मी. आकाराची ही बारव एक पाच टप्प्यात पुर्ण केली आहे. भिंती लगत चार ही बाजूस मिळुन एकुण चौविस देव अष्टकांची निर्मिती करण्यात आली आहे.७

**सारांश :-**

महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये तेर किंवा माढळ येथील बिटातील कुडानंतर आढळणाऱ्या बारव प्रामुख्याने आठव्या नव्या , शतकापासूनच्या आहेत. मोठ्या प्रमाणात या वास्तुंची निर्मिती आकराव्याते तेराव्या शकतकात झाली. अभिलेंखीय नोंद उपलब्ध असलेल्या बहुतांश बारव या बाराव्या शतकातील आहेत. उदा. गणेशवाडी येथील विक्रमादित्यसहावा याच्या काळातील लेख होट्टील येथील चालुक्य कालीन शिलालेख लातूर येथील भूतनाथ मंदिरातील लेख किंवा धर्मापुरी येथील लेख आज अस्तित्वात आहे. बारवांचा विचार केल्यास ते तांत्रीक दृष्ट्या उत्कृष्ट होत्या असे म्हणता येईल. तसेच त्यांच्या स्थापत्य निर्मितीसाठी निवडलेले बारव हे जलस्त्रोत उत्तम होती. त्यामुळे अशा वास्तु कमी अधीक प्रमाणात उपयोगात आणल्या जातात जेथे बारव जलमाडवी पोखरणी आहे. त्याठिकाणी उपलब्ध शिलालेख अभ्यास करताणा हे स्पष्ट होते की, अशा स्थापत्याची निर्मिती होत असताना केवळ कुठल्या एका विशिष्ट राजवंशाची सत्ता नव्हती. तर राष्ट्रकुट कल्याणीचे चालुक्य शिलाहार, कलचुरी यादव इ. राजवंशची सत्ता असताना त्या. त्या स्थानावरील महत्वकांशी सेनानी सामंत श्रेष्ठी व कवचित जाणी सामान्यांचीही स्वतंत्रपणे याची निर्मिती केली उत्तर काळात साधारणतः हा चौदाव्या शतकानंतर यादव शैलीतील मंदिराची निर्मिती कमी झाली. आणि वरील प्रकारच्या बारवांची निर्मीती थांबली. यानंतर चौरस वर्तुळाकाराने एका बाजुने प्रवेश असलेली विहीर निर्माण झाल्या परंतु उत्तर काळात सुध्दा किंवा आज सुध्दा चांगल्या आवस्थेत असलेल्या बारवांची जपवणु केली जात असल्याचे दिसुन येते किंवा त्या बारवांची जतन केले पाहिजेत.

**संदर्भ :-**


१. पाठक अ.श. - बारव स्थापत्य एक आढावा. देविसिंग चव्हाण, गौरव ग्रंथ लातूर पृष्ठ क्र. ४०१, ४६८

२. महाराष्ट्र राज्य गॅझेटर व महाराष्ट्र - दर्शनिक विभाग शासन स्थापत्य व कला. महाराष्ट्र शासन मुंबई पृष्ठ क्र. २२६

३. कित्ता - पृष्ठ क्र. २२६

४. महाराष्ट्र राज्य गॅझेटर व महाराष्ट्र - दर्शनिक विभाग शासन स्थापत्य व कला. महाराष्ट्र शासन मुंबई पृष्ठ क्र. २२७

५. गोखले शोभना - कंधार थ्र. एपीग्राफ ॲन्ड अर्किऔलोजी, सोसायटी ऑफ – इंडिया पृष्ठ क्र. १०५,११४

६. कोलते वि.भी. - महाराष्ट्रातील कांही तांम्रपट शिलालेख मुंबई , पृष्ठ क्र. २०,२१

७. देगलुरकर जी.बी. - टेंपल ऑफ इंडिया ,पृष्ठ क्र. १९.


**संदर्भ ग्रंथ :-**


१. महाराष्ट्र राज्य गॅझेटर - स्थापत्य व कला महाराष्ट्र शासन महाराष्ट्र इतिहास व प्राचीन कालखंड भाग १ आणि २

२. देव पी. आर. - टेंपल्स ऑफ मराठवाडा

३. हेन्ड्री कझिन्स - मिडीबल टेम्पल ऑफ डेक्कन

४. देगलुरकर जी.बी. - टेंपल्स ऑफ महाराष्ट्र ए

५. गोखले शोभना - कंधार थ्र. एपीग्राफ ॲन्ड अर्किऔलोजी, सोसायटी ऑफ –इंडिया,

६. कोलते बी.व्ही. - धर्मापुर येथील शिलालेख
७. कोलते बी.व्ही. - भारतीय इतिहास आणि संस्कृती
८. कोलते बी.व्ही. - महाराष्ट्रातील कांही ताम्रपट व शिलालेख
९. मिराशि वा.वि. - सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्र यांचा इतिहास व कोरिव लेख
१०. मिराशि वा.वि. - शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख
११. पाठक अ.श. - मध्ययुगीन मठ आणि स्थापत्य
१२. पाठक अ.श. - बारव स्थपत्य एक आढावा. देविंसिंग चव्हाण गौरव ग्रंथ.